*This Question Paper contains 16 printed pages.*
***(Part - A & Part - B)***

Sl.No. 0101201

**03(M)**

**(MARCH, 2019)**
**(New Course)**

| પ્રશ્ન પેપરનો સેટ નંબર જેની સામેનું વર્તુળ OMR શીટમાં ઘટ્ટ કરવાનું રહે છે. Set No. of Question Paper, circle against which is to be darken in OMR sheet. |
|---|
| **01** |

**Part - A : Time : 1 Hour / Marks : 50**
**Part - B : Time : 2 Hours / Marks : 50**

## (Part - A)

***Time : 1 Hour]*** ***[Maximum Marks : 50***

**सूचना :**

1) दिलेल्या प्रश्न पत्रिकेत **Part - A** मध्ये वस्तुनिष्ठ प्रकारचे एकून **50** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न आवश्यक आहे.

2) प्रश्नांची क्रम संख्या 1 ते 50 आहे. प्रत्येक प्रश्नाला 1 गुण आहेत.

3) प्रश्न पत्रिका ठिक पद्धतीने वाचने आणि योग्य पर्याय / विकल्प लिहा.

4) आपल्याला वेगळे दिलेले **O.M.R.** शिट मध्ये प्रश्नाच्या समोर **(A) O, (B) O, (C) O** आणि **(D) O** दिले आहे. ज्या प्रश्नाचे उत्तर योग्य आहे, ते विकल्पास गोलाकारा पेनने पूर्ण घट्ट (●) करायचे आहे.

5) दिलेल्या प्रश्नपत्रिकेत वरच्या उजव्या बाजूस प्रश्न पत्र शीट नंबरला **O.M.R.** शीट मध्ये उपलब्ध स्तंभ (कॉलम) मध्ये लिहा.

---

1) 'लीळाचरित्र' हा चरित्रग्रंथ म्हाइंभटांनी कोणत्या वर्षी लिहला?

(A) शके 1210

(B) शके 1200

(C) शके 2100

(D) शके 1250

2) अरण्यातील सागवानादी वृक्ष कोणाच्या परवानगीने तोडून न्यावे?

(A) पोलीस

(B) वनअधिकारी

(C) हुजूर

(D) जंगलखाते

3) इ. स. 2015 मध्ये 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार मिळाला आहे. असे आपल्या पाठ्यपुस्तकातील लेखक कोण? शोधा.

(A) बलवंत मोरेश्वर पुरंदरे

(B) डॉ. द. ता. भोसले

(C) व्यंकटेश दिगंबर माडगुळकर

(D) मधूसुदन कालेलकर

4) 'कपऱ्या' या कथेतील नानांनी कोणती दवंडी पिटवली?

(A) दागिने चोरणाऱ्यास जो पकडून देईल त्यास बक्षिस दिले जाईल.

(B) पैसे चोरणाऱ्यास जो पकडून देईल त्यास बक्षिस दिले जाईल.

(C) कपऱ्या चोरणाऱ्यास जो पकडून देईल त्यास बक्षिस दिले जाईल.

(D) विटा चोरणाऱ्यास जो पकडून देईल त्यास बक्षिस दिले जाईल.

5) 'बिनपैशांचे खेळ' या पाठाचा साहीत्यप्रकार कोणत्या आहे? ते शोधा.

(A) ललित गद्य

(B) चरित्रात्मक लेख

(C) ललीत लेखन

(D) ऐतिहासिक कथा

6) 'सायंटिफिक अँड लिटररी एज्युकेशन सोसायटी' या शाळेच्या प्रिन्सिपाल कोण होत्या?

(A) कमळाबाई

(B) श्रीमती पिरोज आनंदकर

(C) इंदिरासंत

(D) श्रीमती पिरोज आगरकर

7) संत गाडगेबाबांनी कोणत्या यज्ञाचा प्रारंभ केला?

(A) ज्ञानयज्ञ

(B) कर्मयज्ञ

(C) स्वच्छतायज्ञ

(D) धर्मयज्ञ

8) विदर्भात पूर्णा नदीच्या काठी कोणते तिर्थक्षेत्र आहे?

(A) कष्टभंजन

(B) ऋणमोचन

(C) नागनाथ

(D) वैजनाथ

9) "नावात काय नाही" या पाठाचे लेखक कोण आहेत?

(A) आनंद यादव

(B) कुमुद पावडे

(C) मुकुंद टाकसाळे

(D) मधुसुदन कालेलकर

10) 'तु वेडा कुंभार', 'सती ही नाटके', 'बनगरवाडी', 'वावटळ' या कादंबऱ्या लिहणारा लेखक शोधा.

(A) व्यंकटेश माडगुळकर

(B) ब. मो. पुरंदरे

(C) दिलीप चित्रे

(D) निळू दामले

11) जेलर बारी कोणत्या देशाचे होते?

(A) इंग्लंड

(B) आयर्लेन्ड

(C) थायलॅन्ड

(D) भारत

12) 'क्रांतीकारकांची वज्रमुठ' या पाठात "भीक मागून या जगात काही सुद्धा मिळत नाही" हे वाक्य कोण बोलले आहे?

(A) अधिकारी

(B) सावरकर

(C) बारी

(D) वॉर्डर

13) सयाजी महाराजांनी कोणत्या जिल्ह्यात मोफत शिक्षणाचा प्रयोग हाती घेतला होता?

(A) भावनगर

(B) अमरेली

(C) खेडा

(D) डांग

14) 'माझ्या संस्कृतिची कथा' या पाठातील लेखिकेला संस्कृत शिकवण्यात खरीखुरी मदत कोणाची झाली?

(A) दामले गुरुजी

(B) गोखले गुरुजी

(C) हातेकर गुरुजी

(D) कदम गुरुजी

15) "द डायरा ऑफ अॅन फ्रँक" या इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा मराठीत अनुवाद ......... यांनी केला.

(A) मंगला निगुडकर

(B) सरोजिनी बाबर

(C) स्मिता भागवत

(D) अरुणा ढेरे

16) ज्ञानेश्वरी आधीचे नाव काय होते?

(A) चांगदेवपासष्टी

(B) भावार्थदिपीका

(C) अभंग

(D) महाभारत

17) नागपूर येथे नोकरी करणारे मराठीतले नामवंत कवी होते आणि त्यांचा 'बनफुल' हा काव्यसंग्रह खूप गाजला होता? कवी शोधा.

(A) मनोहर महादेव देशपांडे

(B) बाबा आमटे

(C) नारायण सुर्वे

(D) मंगेश पाडगांवकर

18) बाबा आमटे यांनी कोणत्या जिल्ह्यात माडिया गौड आदिवासी जमातीसाठी लोकबिरादरी प्रकल्प उभारला होता?

(A) सांगली

(B) सातारा

(C) गडचिरोली

(D) यवतमाळ

19) "माणूस माझे नाव" या कवितेतील कवी कशाच्या विरुद्ध क्षणक्षण नवा उठाव करतो?

(A) दैत्याच्या

(B) दैन्याच्या

(C) देशाच्या

(D) दुर्भिक्ष्याच्या

20) 'माझ्या कवितेची चव' या काव्यात कवीच्या कवितेने काट्या कुट्यात .......... जतन करावी.

(A) भाषा

(B) चव

(C) गोडवा

(D) हिरवळ

21) 'भारतीय जवानाचे पत्र' या कवितेतील जवानाच्या घरासमोर कशाचे झाड आहे?

(A) वड

(B) आंबा

(C) पिंपळ

(D) चिंच

22) परभणी येथे भरलेल्या 1995 च्या अखिल भारतीय मराठी साहीत्य संमेलनाचे अध्यक्षपद कोणी भूषविले आहे?

(A) नारायण सूर्वे

(B) मंगेश पाडगांवकर

(C) दासू वैद्य

(D) अनिल

23) मंगेश केशव पाडगांवकर यांना 1980 साली कोणता पुरस्कार मिळाला आहे?

(A) साहीत्य अकादमी पुरस्कार

(B) पद्मश्री पुरस्कार

(C) मॅगसेसे पुरस्कार

(D) महाराष्ट्र भूषण पुरस्कार

24) 'जमाखर्च स्वातंत्र्याचा' या कवितेत सत्तेभोवती कशाचे कडे पडले आहे?

(A) अत्याचाराचे

(B) मोहाचे

(C) भ्रष्टतेचे

(D) मायेचे

25) 'श्रावणझाड' कवितेचे कवी अनिल यांचे खरे नाव काय आहे?

(A) आचार्य अत्रे

(B) आत्माराम रावजी देशपांडे

(C) वि. वा. शिरवाडकर

(D) ना. सी. फडके

26) कवी अनिल यांनी खालीलपैकी कोणत्या कवितेला 'दशपदी' हे नाव दिले आहे?

(A) श्रावणझाड

(B) माणूस माझे नाव

(C) दूपार

(D) नदी वाहते आहे

27) 'नदी वाहते आहे' या कवितेतील बगळ्याचा रंग आता कसा झाला आहे?

(A) शुभ्र

(B) काळा

(C) निळा

(D) मळल्यासारखा

28) 'सुखेच माझी मला बोचती, साहसास मम सीमा नसती, नवीन क्षितिजे सदा खुणवती, दूर दाट निविडात मांडला पुन्हा मी नवा डाव' या काव्यपंक्ती कोणत्या कवितेमधील आहेत?

(A) दूपार

(B) माणूस माझे नाव

(C) जमाखर्च स्वातंत्र्याचा

(D) श्रावणझड

29) 'माझ्या कवितेची चव' या कवितेचा साहीत्यप्रकार सांगा.

(A) भावकविता

(B) ग्रामीण कविता

(C) निसर्गकविता

(D) प्रेमकविता

30) कवी 'दासू वैद्य' यांनी खालीलपैकी कोणत्या कवितेचे लेखन केले आहे?

(A) माणूस माझे नाव

(B) दूपार

(C) नदी वाहते आहे

(D) भारतीय जवानांचे पत्र

35) खालील पैकी 'केवल वाक्य' ओळखा.

(A) पावसाची पहिली सर येताच सुगंध सर्वदूर पसरतो.

(B) पावसाची पहिली सर आली की, मातीचा सुगंध सर्वदूर पसरतो.

(C) आम्ही घराबाहेर पडलो आणि पावसाला सुरुवात झाली.

(D) आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो.

36) 'मी गुलाबाचे रोप आणले आणि आमच्या बागेत लावले आहे! या वाक्याचा प्रकार ओळखा.

(A) मिश्र वाक्य

(B) केवल वाक्य

(C) संयुक्त वाक्य

(D) यापैकी नाही

37) 'घनश्याम' या समासाचा प्रकार ओळखा.

(A) उपपद तत्पुरुष

(B) कर्मधारय तत्पुरुष

(C) द्विगू तत्पुरुष

(D) विभक्ती तत्पुरुष

38) रामचंद्र पंचवटीत राहत होते. – अधोरेखीत समासाचा प्रकार ओळखा.

(A) बहुव्रीही समास

(B) नञ तत्पुरुष समास

(C) द्विगू समास

(D) अव्ययीभाव समास

31) खालील पैकी शुद्ध शब्द ओळखा

(A) क्लेष

(B) निशेध

(C) पुरस्कर्ता

(D) निरवान

32) खालील पैकी अशुद्ध शब्द ओळखा.

(A) दर्वळ

(B) कनिष्ठ

(C) क्षीतीज

(D) निद्रानाश

33) 'समाजात समता असावी' – नकारार्थी वाक्य ओळखा.

(A) समाजात विषमता असू नये.

(B) समाजात विषमता आहे.

(C) समाजात समता नसावी.

(D) समाजात विषमता असावी.

34) 'जगी सर्वसुखी असा कोण आहे?' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(A) नकारार्थी

(B) होकारार्थी

(C) प्रश्नार्थी

(D) उद्गारार्थी

35) खालील पैकी 'केवल वाक्य' ओळखा.

(A) पावसाची पहिली सर येताच सुगंध सर्वदूर पसरतो.

(B) पावसाची पहिली सर आली की, मातीचा सुगंध सर्वदूर पसरतो.

(C) आम्ही घराबाहेर पडलो आणि पावसाला सुरुवात झाली.

(D) आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो.

36) 'मी गुलाबाचे रोप आणले आणि आमच्या बागेत लावले आहे! या वाक्याचा प्रकार ओळखा.

(A) मिश्र वाक्य

(B) केवल वाक्य

(C) संयुक्त वाक्य

(D) यापैकी नाही

37) 'घनश्याम' या समासाचा प्रकार ओळखा.

(A) उपपद तत्पुरुष

(B) कर्मधारय तत्पुरुष

(C) द्विगू तत्पुरुष

(D) विभक्ती तत्पुरुष

38) रामचंद्र पंचवटीत राहत होते. – अधोरेखीत समासाचा प्रकार ओळखा.

(A) बहुव्रीही समास

(B) नञ तत्पुरुष समास

(C) द्विगू समास

(D) अव्ययीभाव समास

39) 'आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे!' या उदाहरणातील अलंकार ओळखा.

(A) व्यतिरेक

(B) रुपक

(C) यमक

(D) उपमा

40) 'रुपक' अलंकाराचे उदाहरण ओळखा.

(A) लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा ऐरावत रत्न थोर त्यासी अंकुशाचा मार

(B) लहान मुल म्हणजे मातीचा गोळा आकार द्यावा तशी मुर्ती घडते

(C) कामधेनूच्या दुग्धाहुनिही ओज हिचे बलवान

(D) ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू

41) 'मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढ मासी' हे कोणत्या वृत्ताचे उदाहरण आहे?

(A) पृथ्वी

(B) मंदा क्रांता

(C) भुजंगप्रयात

(D) मालीनी

42) खालील पैकी 'वसंततिलका' या वृत्ताचे उदाहरण ओळखा.

(A) कुठे भटकशी घना? वळुनि ऐक केकावली.

(B) मना सज्जना तू कडेनेच जावे.

(C) आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश.

(D) पखरण बघ घाली भूवरी पारिजात.

43) 'केलेले उपकार न जाणणारा' या शब्दसमुहासाठी एक शब्द द्या.

(A) कृतज्ञ

(B) कृतघ्न

(C) कल्पवृक्ष

(D) कामधेनू

44) 'हुतात्मा' या सामासिक शब्दाचा विग्रह ओळखा.

(A) शत्रुला सामील झालेला

(B) शत्रुकडील बातम्या काढून आणणारा

(C) देशासाठी प्राणार्पण केलेला

(D) वरीलपैकी नाही

45) 'अवघडून जाणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

(A) संकोच वाटणे

(B) स्थिरता येणे

(C) काळजी वाटणे

(D) अडचणीत सापडणे

46) 'नावड असणे' या अर्थासाठी वाक्प्रचार शोधा.

(A) भिती वाटणे

(B) वावडे असणे

(C) दु:ख होणे

(D) महत्व नसणे

47) 'उदक' या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा.

(A) नीर

(B) जल

(C) पाणी

(D) A, B आणि C तिन्ही

48) 'समता' या शब्दाचा विरोधी शब्द लिहा.

(A) समानता

(B) विषमता

(C) विसंगत

(D) सुसंगत

49) 'दातरणे' या ग्रामीण शब्दाचा मराठी प्रचलीत अर्थ लिहा.

(A) दात खाणे

(B) चावणे

(C) दात घासणे

(D) दात दुखणे

50) 'विश्रब्ध' या शब्दाचा अर्थ सांगा.

(A) दबलेला

(B) दमलेला

(C) दडलेला

(D) पडलेला

# 03(M)

**(MARCH, 2019)**

**(New Course)**

## (Part - B)

*Time : 2 Hours]* *[Maximum Marks : 50*

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) प्रश्नपत्रिकेत **Part - B** मध्ये चार विभाग आहेत आणि एकूण 1 ते 13 प्रश्न आहेत.
3) सर्व प्रश्न आवश्यक आहेत. या मध्ये पर्याय दिले आहेत.
4) उजव्या बाजूला प्रश्नाचे गुण दिले आहेत.
5) नविन विभाग नव्या पानावर लिहावे.
6) प्रश्नाचे उत्तर क्रमानुसार द्यावे.

### विभाग - अ

■ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा:** [4]

1) 'संभाजीस पत्र' या पाठात पत्राच्या आरंभी समर्थांनी संभाजीस काय उपदेश केला आहे?

किंवा

शिक्षणक्षेत्रात सयाजीराव महाराजांनी 1885 साली कोणता महत्वाचा प्रयोग सुरु केला?

■ **खालील प्रश्नांची दोन - तीन वाक्यात उत्तरे लिहा:** [4]

2) लेखकाच्या मते कोणता खेळ अवघड आहे? तो कसा खेळला जाई?

3) शुभमंगळ वधू वर सूचक मंडळात पमीच्या नावा समोर कोणता मजकूर लिहिला होता?

किंवा

माळीणबाई म्हातारी झाली तरी तिला काम का करावे लागते?

■ **खालील प्रश्नांची आठ - दहा वाक्यात उत्तरे लिहा:** [3]

4) 'नदी वाहते आहे' या कवितेत नदीच्या पूर्वीच्या आणि आताच्या स्थितीचे वर्णन करा.

किंवा

'दुपार' कवितेत कवीने दुपारचे केलेले वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

■ **खालील प्रश्नांची दोन – तीन वाक्यात उत्तरे लिहा:** [4]

5) कवी बिंदुमात्र असा क्षुद्र असूनही त्याने काय जिंकले आहे?

6) ‘श्रावणझड’ या कवितेच्या आधारे ‘श्रावणातल्या पावसाचे वर्णन करा.

किंवा

संत ज्ञानेश्वरांनी ‘लावण्याचा पुतळा’ कोणाला उद्‌देशून म्हटले आहे?

## विभाग – ब

■ **खालील अपठित परिच्छेद वाचून त्यांचा एक तृतीयांश भागात सारांश लिहा व त्यास योग्य शिर्षक लिहा.** [5]

7) अगदी पहिल्याप्रथम परमेश्वराची मुर्ती म्हणजे आई! ‘मातृदेवो भव!’ जन्मत:च मुलाला आईशिवाय दुसरे कोण दिसते? वत्सलतेच्या रुपाने ती परमेश्वराचीच मूर्ती तेथे उभी असते. ह्या मातेची व्याप्ती आपण वाढवू व ‘वंदे मातरम्’ म्हणून राष्ट्रमातेची व पुढे भूमातेची, पृथ्वीची पूजा करु. परंतु आरंभी उंच उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहिली ती मातेची. आईच्या पूजेने मोक्ष मिळणे अशक्य नाही आईची पूजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. म्हातारपणी आपल्या उपयोगी पडेल असा हिशेब करुन का ती आपल्या मुलाची सेवा करत असते? छे छे ! तिने त्या मुलाला जन्म दिला तिला वेदना झाल्या. त्या वेदना तिला त्या मुलाचे वेड लावतात. त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाही ती माऊली म्हणजे निस्सीम सेवेची मुर्ती. उत्कृष्टातील उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे ही मातृपूजा आहे. ईश्वराला आई या नावानेच हाक मारावयाची. आई या शब्दाहून आणखी उच्च शब्द आहे कोठे? आई हे पहिले ठळक अक्षर तेथे ईश्वर पहावयास शिका.

■ **खालील पैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना विस्तार लिहा.** [5]

8) अ) मरणात खरोखर जग जगते.

ब) जया अंगी मोठेपण तया यातना कठीण.

## विभाग - क

9) संकटात सापडलेल्या मित्राला आपण कसे वाचविले हे आईला पत्र लिहून कळवा. [5]

पत्ता :- 401, मधुबन अपार्ट मेंटस,
शिवाजी पथ, कल्याण
दि.

(सूचना :- पत्रात तुमचे नाव, पत्ता किंवा सहीचा उल्लेख करू नये)

10) तुमच्या शाळेत 'श्रमदान शिबीराचा कार्यक्रम' प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला त्या कार्यक्रमाचा अहवाल लिहा. [5]

## विभाग - ड

11) खालील अपठित गद्य उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. [3]

किती सुंदर होते आनंदवन ! प्रत्येक ऋतूत ते वेगळे रूप घेऊन समोर येई. थंडीत धुक्याची चादर पांघरुन घेतलेले आनंदवन रानफुलांच्या विविध रंगांनी नटत असे. फळांचे गोड लेणे अंगावर घेऊन वृक्ष दात्याच्या अविर्भावात उभे असत. पक्ष्यांचे थवेच्या थवे या फळांच्या मोहाने वृक्षाच्या शेंड्यावर गर्दी करीत. दूरवर रानातून तांबटाची ठोक - ठोक कानावर येई. नीलकंठ भारद्वाज, डौलदार तुऱ्याचा सुतार, सतत चर्चा करणारे व एकमत न झाल्याने हमरीतुमरीवर येणारे सातभाई, चिमण्या, रावे असे अनेक रंगी बेरंगी मित्र आमच्या झोपडीच्या आसपास वावरत साऱ्या सृष्टीत एक विलक्षण चैतन्य भरुन राही. पुढे शिशिराचे बोचरे वारे वाहू लागत. पानगळतीला सुरुवात होई. अंगणातले पानांचे ढीग उचलून फेकतांना माझी दमछाक होऊन जाई.

चैत्र - वैशाखात पळस फुलांच्या लाल ज्वाला आनंदवनाला लपेटून टाकीत. सृष्टीला नवीन पालवी फुटे. आम्रवृक्षाच्या पानाआडून कोकिळाचे मंजूळ कूजन कानावर पडू लागे. तसा विदर्भात वसंत आणि ग्रीष्म यात फारसा फरक नाही. तापदायक आणि अतितापदायक असा प्रकार एकदा निसर्गाची भट्टी तापायला लागली की, अंगाची लाही होऊन जाते.

साधना आमटे

प्रश्न :-

अ) थंडीत आनंदवनाचे कोणते रूप नजरेस पडत असे?
ब) शिशिर ऋतूत लेखिकेची दमछाक का होई?
क) लेखिकेने 'लाल ज्वाला' ही उपमा कोणाला दिली आहे?

12) खालील अपठित कविता वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. [4]

गे मायभू तुझे मी
फेडिन पांग सारे;
आणीन आरतीला
हे सूर्य, चंद्र, तारे ।।१।।

आई, तुझ्यापुढे मी
आहे अजून तान्हा
शब्दात सोड माझ्या
आता हळूच पान्हा ।।२।।

आई, तुझ्यापुढे ही
माझी व्यथा कशाला?
जेव्हा तुझ्यामुळे ह्या
जन्मास अर्थ आला ॥३॥

मी पायधूळ घेतो
जेव्हा तुझी जराशी
माझी ललाटरेषा
बनते प्रयागकाशी ॥४॥

आई तुझी अशी मी
गाईन रोज गाणी
माझी तुझ्या दुधाने
गेली भिजून वाणी ॥५॥

– सुरेश भट

प्रश्न :–

अ) कवी कोणाची आरती करु इच्छित आहे? आरतीसाठी तो कोणाकोणाला आणणार आहे?

ब) मायभूमीच्या पायधुळीत कवीला कोणते सामर्थ्य गवसते?

क) आईसाठी कवी रोज काय करणार आहे?

ड) आईसाठी रोज गाणी गाण्याचे कवीने का ठरवले आहे?

■ खाली दिलेल्या मुद्यावरुन कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 शब्दात निबंध लिहा. [8]

13) अ) सीमेवरील जवानाचे मनोगत :–

मुद्दे:– घरापासून दूर —– लढाई सुरु होण्याची शक्यता —– रजा रद्द —– तातडीने सीमेवर —– डोळ्यात तेल घालून स्वदेशाचे रक्षण —– प्रतिकूल हवामान —– देशवासीयांचे प्रेम —– कामाची कृतार्थता —– काम करण्यास नवे स्फुरण मिळते –— लोकांकडून आमची एकच अपेक्षा —– आमच्या कुटुंबाची काळजी घ्या.

ब) निसर्गाचा प्रकोप – भूकंप :–

मुद्दे:– मानवाचे निसर्गाशी नाते —– मानवाच्या वर्तनामूळे निसर्गाचा प्रकोप —– भूकंप —– विश्वासाला तडा —– अनपेक्षित घटना —– लोक झोपेत असतांना भूकंप —– घराच्या भिंती मृत्युला कारण —– मृत्यूचे तांडव —– मदतीचे हात —– भूकंपापाठोपाठ पाऊस —– हजारो हातांनी मदत —– विविध प्रकारे —– पण त्यातही समाजकंटकाचे दर्शन —– मन विपन्न —– निसर्गापुढे माणूस दुर्बल.

क) वाढती लोकसंख्या – समस्येकडून समस्यापरिहाराकडे :–

मुद्दे:– लोकसंख्या वाढीचे भारतातले प्रमाण —– लोकसंख्या वाढ नक्की कुठे? (ग्रामीण भागात की शहरात) —– लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या समस्या – उपाययोजना —– लोकसंख्या ही शक्ती म्हणून तिचा वापर करणे.